## स्वप्नवर्खी पहाट

विरघळावे सहज स्वप्नवर्खी पहाटे
तुला पांघरावे शुभ्रवर्णी धुक्याने
श्वासात सारी फुले वेचताना
बरसून जावे नभीच्या चांदण्याने |

पहाट ओली अशी ओघळावी
जशी ओवळी मुग्ध खाली गळावी
तिच्यापाशी माझी गंधित-गुपित
जरी ती तुझीही, तुला न कळावी |

भिने रानवारा मिठी गाढ-गहिरी
उरी शिरशिरी मंद एकांत बहरी
क्षण गोठवावे दहिवराचेच मोती
लगडून येतील या सुखद प्रहरी |

तू हळू सावरावे स्वप्न हातात आले
मी तुला पाहताना कधी त्यात न्हाले
ओंजळीच्या तळाशी तरी रात्र उरली
तिच्या साक्षीने स्वप्न नक्षत्र झाले |

**----संध्या रानडे**